PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 6

# दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाचे ग्रामीण विकासात योगदान

**डॉ. मदन जी. प्रधान**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
ऑर्टस् कॉलेज, सिहोरा,
तह. तुमसर, जि. भंडारा
**महाराष्ट्र भारत**

**सारांश :**

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः भारताच्या ग्रामीण भागात दारिद्रयाचे प्रमाण मोठे होते. देशातील दारिद्रय कमी करण्यासाठी नियोजन काळात शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकासावर भर देण्यात आला. तरीही समस्या सुटली नाही. त्यामुळे दारिद्रय निर्मूलनासाठी विशेष कार्यक्रम व योजना राबविण्यात आल्या. प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाचे ग्रामीण विकासात काय योगदान आहे? याविषयी अध्ययन केले आहे.

**कि वर्ड :** ग्रामीण विकास, दारिद्रय निर्मूलन, आर्थिक विकास

**प्रस्तावना :**

भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे भारताचा विकास हा खेड्यांच्या विकासावरच अवलंबून आहे. भारताचा आर्थिक व सामाजिक जीवनातील परिवर्तन ग्रामीण समाजातील परिवर्तनानेच घडून येणार आहे. हे परिवर्तन घडून येत असतांना ग्रामीण विकाससमोर मागासलेली शेती ग्रामीण दारिद्रय, ग्रामीण बेरोजगारी अशी आव्हाने निर्माण झालेली आहेत. म्हणूनच ग्रामीण विकासाची आव्हाने लक्षात घेऊन त्या आव्हानांचे निराकरण करणे आवश्यक

आहे. त्यासाठी ग्रामीण दारिद्रय निर्मूलन योजनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2017–2018 नुसार भारतामध्ये सन 2011–2012 मध्ये ग्रामीण भागात 816 रुपये व शहरी भागात 1000 रुपये मासिक खर्च आपल्या किमान गरजा भागविण्यासाठी व्यक्तीला लागत होता. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागात 967 रुपये तर शहरी भागासाठी 1162 रुपये उपभोग खर्च दिसून येतो. यापेक्षा कमी उत्पन्न असणारे सर्व दारिद्रयरेषेखाली होते. म्हणजेच महाराष्ट्रात 17.4 टक्के तर भारतात 21.9 टक्के लोकसंख्या दारिद्र रेषेखाली असल्याचे दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्था जागतीक पातळीवर एक विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. तथापी भारतातील दारिद्रयाचे प्रमाण विचारणीय आहे. जगातील एकूण दारिद्रय रेषेखाली असलेल्या लोकसंख्येपैकी एक तृतीयांष लोकसंख्या भारतात आहे. वर्तमान विकासात षहरी विकासाचे प्रमाण वाढत आहे. मात्र ग्रामीण विकास त्या तुलनेत कमी होतांना दिसून येतो. कारण षहरातील चकाचक संस्कृतीच्या आकर्षणाने ग्रामीण भागातून लोक षहरांकडे स्थलांतरीत होत आहेत. खरं तर ही एक राष्ट्रीय समस्या निर्माण होत आहे. यावर वेळीच उपाय न केल्यास ग्रामीण व षहरी विकासात विषमतावादी परिस्थिती निर्माण होऊन अनेक गंभीर प्रष्न निर्माण होऊ षकतात. सोबतच ग्रामीण भागात रोजगाराचा गंभीर प्रष्न निर्माण होऊ षकतो. हे ओळखूनच सरकार ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबूत करण्यासाठी अनेक कार्यक्रम राबवित आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता लक्षात येते की अतिरीक्त लोकसंख्या, बेरोजगारी, निर्धनता, विषमता, अल्प उत्पादकता या भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख समस्या आहेत. यामुळे देषातील दारिद्रयामध्ये वाढ होतांना दिसून येते. सध्या भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था षेतक–यांची अल्प उत्पादकता, ग्रामीण बेरोजगारी व दारिद्रय या प्रमुख समस्यांनी घेरल्या गेलेली आहे. त्यामुळे वाढते कर्जबाजारीपणा व वाढत्या षेतक–यांच्या आत्महत्या यावर उपाययोजना होणे ही काळाची गरज आहे. सरकारने ग्रामीण विकासाकरीता विविध उपक्रम राबविलेले आहेत. विषेषतः ग्रामीण भागातील जनतेच्या

विकासासाठी राबविण्यात आलेले दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम याचा विचार करता या कार्यक्रमांना अपेक्षित यष मिळालेले नाही. ग्रामीण विकास एक बहुआयामी संकल्पना आहे. संकुचित दृष्टीकोणाने विचार करतांना ग्रामीण विकास म्हणजे कृषी, पषुपालन, ग्रामीण हिस्तकला, उद्योग, षेतीविकास इ. द्वारे ग्रामीण क्षेत्राचा विकास करणे होय. परंतू व्यापक दृष्टीकोणातून ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनामध्ये गुणात्मक प्रगती घडवून आणणे. पर्यायाने ग्रामीण भागातील जनतेच्या जीवनमानात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, औद्योगीक व संरचनात्मक परिवर्तन घडवून आणणे होय. जागतिक बॅकेच्या मते, ग्रामीण विकास एक विषिष्ट समुह – ग्रामीण दारिद्रयात जगणा–यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाला प्रगतीपथावर नेण्याकरीता एक रणनिती आहे.

डॉ. दांडेकर आणि रथ यांच्या मते, ''2250 पेक्षा कमी उष्मांक मिळणा–या व्यक्तीच्या परिस्थितीस दारिद्रयाची परिस्थिती असे म्हटले आहे.'' तसेच नियोजन मंडळाच्या मते, ''षहरी भागातील लोकांना 2100 उष्मांक व ग्रामीण भागातील लोकांना 2400 उष्मांक मिळणे आवष्यक आहे. अषी परिस्थिती नसेल तर त्या स्थितीला दारिद्रयाची स्थिती असे म्हणतात.'' थोडक्यात दारिद्रय हे एक वास्तव असून ज्या व्यक्तीस मुलभूत गरजांची पुर्तता करता येत नाही ती व्यक्ती दरिद्री समजली जाते. सर्वसाधारणपणे ज्यांना आपल्या उत्पन्नातून किमान आवष्यक गरजही पूर्ण करता येत नाही. अषा लोकांना दारिद्रयरेषेखालील लोक असे म्हणतात. त्याचप्रमाणे स्वतःच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी उपलब्ध होणारी साधने ज्यांना अपुरी पडतात. अषा माणसांची स्थिती म्हणजे दारिद्रय होय असे म्हणता येते.

भारतात दारिद्रयाचे प्रमाण किती आहे? त्या संबंधी भारतातून विविध अर्थतज्ञांनी नियोजन मंडळाने नियुक्त केलेल्या तज्ञांच्या गटाने वेगवेगळी अपली मते मांडली आहेत, असे असले तरी तेंदुलकर समितीच्या अहवालानुसार भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 1993–94 मध्ये 45.3 टक्के, 2004–05 मध्ये 37.2 टक्के तर 2009–10 मध्ये 29.8 टक्के आहे. ग्रामीण क्षेत्रात 1993–94 मध्ये 50.1 टक्के, 2004–05 मध्ये 41.8 टक्के तर 2009–10 मध्ये 33.8 टक्के आहे व षहरी क्षेत्रात 1993–94 मध्ये 31.8 टक्के, 2004–05 मध्ये 25.7 टक्के तर

2009–10 मध्ये 20.9 टक्के आहे. ग्रामीण व षहरी भागाची तुलना केली असता दिसून येते की, ग्रामीण क्षेत्रापेक्षा शहरी क्षेत्रातील दारिद्रयाचे प्रमाण बरेच कमी आहे. एकूणच ग्रामीण भागातील गरीबी देषातील एकूण गरीबीला प्रभावित करणारी आहे. कारण ग्रामीण भागातील गरीबीमुळेच लोक षहरी भागात स्थलांतरण करतात. अलिकडे भारतात राहणा–या दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची संख्या घटली असली तरी अजुनही दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या मात्र बरीच मोठी आहे. त्यामुळेच दारिद्रयाचे निर्मुलन करणे आवष्यक आहे.

**दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम :**

नवीन आर्थिक धोरण राबवू दोन दषकाचा काळ उलटला आहे. या काळात उद्योग व सेवा क्षेत्रांनी जवळपास दहा टक्के विकासदर नोंदविला असतांना षेतीमध्ये मात्र तो दोन टक्क्यांपेक्षा खाली राहीला आहे आणि आता चार टक्क्याच्या वर नेण्याचे लक्ष निर्धारित करण्यात आले आहे. षेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावरील, घटकांवरील त्याचा खर्च वेगाने वाढत गेला पण पिकांच्या उत्पादकतेत अपेक्षित असणारी वाढ मात्र मंदावली गेली आहे. षेतीचे परंपरागत स्वावलंबी तंत्र मागे पडून खर्च वाढविणा–या नवीन तंत्रांचा प्रभाव वाढलेला आहे. खर्च आणि उत्पन्न यांचा मेळ न बसण्याची त्यांची स्थिती वर्षानुवर्षे राहील्यामुळे हताष असाहाय्य षेतकरी आत्महत्येकडे वळलेला आहे. एकूणच षेती क्षेत्रातील मागासलेपणा ग्रामीण विकासावर विपरीत परिणाम टाकणारा आहे.

आज भारतात गरीबी व बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांना कमी किंमतीत अन्न–धान्याचा पूरवठा होत असल्यामुळे मजुरांची मजुरी कमी झाली आहे. नरेगामुळे षेतीसाठी मजूर मिळेनासे झाले आहेत. ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मुलनासाठी षेतीमध्ये मुलभूत सोयी–सुविधा निर्माण करण्याची व त्यासाठी भांडवलाची गरज आहे. दारिद्रयातून बाहेर पडायला प्रत्येकाने प्रयत्न करायला हवे. ग्रामीण भागातील षेतीच्या समस्येवर व षेतक–यांच्या आत्महत्येवर तोडगा काढण्यासाठी पंचतारांकीत हॉटेलमध्ये चर्चासत्रे, परिसंवाद आयोजित केले जातात. सांगायचा मुद्दा हा आहे की, दारिद्रय व

गरीबी हटविण्यासाठी कोटयावधी योजना राबविल्या जातात. मात्र त्याचा फायदा जे गरीब आहेत त्यांना न होता नोकरषाहीला व नेत्यांना होतांना दिसून येत आहे. कुठल्याही सरकारला गरीबांचा कळवळा असतो कारण तेच त्यांच्या श्रीमंतीला कारक असतात.

दारिद्रयाचे निर्मुलन करण्याकरीता भारत सरकारने पुढील कार्यक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, इंदिरा आवास योजना, दषलक्ष विहिर योजना, सुषिक्षित बेकारांना सहाय्य, उद्योगांना प्रोत्साहन, छोटे षेतकरी विकास संस्था, वीस कलमी कार्यक्रम (जुलै 1975), ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, सिमांत षेतकरी आणि षेतमजूर विकास कार्यक्रम (1970–71), एकात्मीक कोरडवाहू षेती विकास कार्यक्रम, ट्रायसेम व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम इ. उपक्रम सरकारने चालविले आहेत. परंतू या कार्यक्रमाची व उपक्रमांची परिणामकारकता पाहिजे त्या प्रमाणात दिसून येत नाही. आजही ग्रामीण भागात गरीबी एक वास्तव आहे.

**निष्कर्ष :**

दारिद्रय निर्मूलनासाठी शासकीय पातळीवर ज्या विविध योजना राबविण्यात आल्या आणि सध्या राबविण्यात येत आहेत. या योजनांपैकी काही महत्त्वाच्या योजनांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलनाशी येतो. केंद्र सरकारने नियोजनाला सुरवात झाली तेव्हापासूनच ग्रामीण विकासाकरीता व प्रामुख्याने ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मुलनाकरीता प्रयत्न केले आहे. याकरीता वेळोवेळी समित्या नियुक्त करून षिफारषीनुसार पंचवार्षिक योजनांमध्ये अनेक योजना राबविल्या आहेत. परंतू अषा योजनांचा ग्रामीण भागातील लोकांची गरीबी कमी करण्याकरीता विषेष फायदा झाला असे दिसत नाही. परिणामी आर्थिक विषमतेत वाढ झाली आहे. म्हणूनच ग्रामीण अर्थव्यवस्थेला सक्षम करण्यासाठी प्रामुख्याने ग्रामीण भागात भूमीसुधार तंत्र अवलंबून अधिक अन्न–धान्य

उत्पादन व ग्रामीण क्षेत्रात रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध करून ग्रामीण भागातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगती निष्चित केली जाऊ षकते.

**संदर्भ :**

1. गोविलकर, विनायक (2008), ''आर्थिक संकल्पना'' डायमंड पब्लिकेषन्स, पुणे.
2. कविमंडन, विजय (2002), ''कृषी अर्थषास्त्र'', मंगेष प्रकाषन, नागपूर.
3. मायी, सुनिल (2009), ''महाराष्ट्रातील गरीबी'', डायमंड पब्लिकेषन, पुणे
4. पुरी, मिश्र (2012), ''भारतीय अर्थव्यवस्था'', हिमालया पब्लिषिंग हाऊस, मुंबई.
5. जाधव तुकाराम – संपादक, 'महाराष्ट्र वार्षिकी' 2008–2009, द युनिक ॲकॅडेमिक, पुणे.
6. दास्ताने संतोष – 'महाराष्ट्र 2007', दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे.